Date: 17th Jan.2014

# PUDHARI
# PAGE NO.5

माय मावळ ५ पुढारी | पुणे, शुक्रवार १७ जानेवारी २०१४

## संक्षिप्त

## निगडीत आजपासून राष्ट्रीय परिषद

**पिंपरी :** पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या वतीने १७ व १८ जानेवारी रोजी व्यवस्थापनावर आधारित विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद २०१४ चे आयोजन केले आहे. निगडी प्राधिकरण, सेक्टर २९, आकुर्डी रेल्वे स्टेशन येथील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १७) सकाळी नऊ ते सायंकाळी सातदरम्यान 'टेक्निकल सेशन'; तसेच मार्गदर्शनपर कार्यक्रम होतील. कार्यक्रमाच्या उद्‌घाटनाला बंगळूर, आयआयएममधील प्रो. डॉ. मिथलेश्वर झा, पीआयजीईओ कंपनीचे डायरेक्टर जगदीश गंधे उपस्थित असतील. शनिवारी (दि. १८) सकाळी नऊ ते सायंकाळी सातदरम्यान टेक्निकल सेशन, पुरस्कार वितरण; तसेच विविध कार्यक्रम होतील. या वेळी विंग कमांडर पी. व्ही. पाटील, डॉ. अतनू घोष, प्रो.एन. जे. पवार, प्रो. अमिताभ पटनायक उपस्थित असतील. मॅनेजिंग डायरेक्टर भरत पाटील, ऋचा पाटील, डी. आर. तनुरे, कर्नल कैलासचंद आदींनी संयोजन केले आहे, अशी माहिती प्रा. ललित साद यांनी माहिती दिली.

Date: 22nd Jan.2014

# THE INDIAN EXPRESS

## NEWS

## PAGE NO.3

### Meet on innovations organised at DYPIMS

**A NATIONAL** conference on 'Innovations: A New Paradigm in Management' was organised by Dr D Y Patil Institute of Management Studies (DYPIMS), Akurdi, recently. The two-day event offered a platform to discuss and debate contemporary research in the functional areas of management, a release said. Mitheleshwar Jha, Professor at IIM Bangalore, said, "To be innovative one has to be tolerant towards failures. Those who are reluctant to accept failures and are only comfortable in talking about success find it difficult to come up with new ideas for innovations." Jagdish Gandhe, Director, Piaggo Vehicles Pvt. Ltd, said a creative person should have an attitude to accept change and newness. "The creative mind should have an ability to imagine or invent something new by combining changing or re-applying existing ideas," he said. Research papers from graduates and undergraduate students were also presented during the conference. Bharat Chavan Patil, Managing Director (Operations), and Kailash Chand, Director, DYPIMS, were also present.

Dr. D. Y. Patil Inst. of Management Studies
LIBRARY
22/1/14

Date: 21st Jan.2014

# LOKMAT
## HALLO PIMPRI-CHICHWAD
## PAGE NO.5

# 'अपयश नाकारणारे शोधापासून विमुक्त'

पिंपरी : अपयशाची कारणमिमांसा ही नवीन शोधास उपयुक्त असते, जे कोणी अपयश स्वीकारत नाहीत, ते नवीन शोधापासून विमुक्त होत जातात. उत्सुकता, जिज्ञासा, प्रयोगशीलता, विजयाचे सखोल ज्ञान व नियोजनानुसार काम करण्याची क्षमता असल्यासच शोध घडवता येतात. संशोधनाशिवाय प्रतिभाशक्ती म्हणजे पायाविना पंख असलेला पक्षी, असे प्रतिपादन डॉ. मिथिलेश्वर यांनी केले.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, आकुर्डी येथे आयोजित राष्ट्रस्तरीय परिषदेच्या अध्यक्षस्थानावरुन आयआयएम लखनौचे डॉ. मिथिलेश्वर बोलत होते. 'शोध ही व्यवस्थापनाची नवी परिभाषा' या परिषदेच्या विषयानुसार त्यांनी मार्गदर्शन केले.

जगदीश गांधे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भरत चव्हाण पाटील व कर्नल (डॉ.) कैलास चंद यांनी मनोगत व्यक्त केले. संपूर्ण भारतातून ५५ शोधनिबंध या परिषदेत सादर केले.

कार्यकारी संचालक विंग कमांडर (नि.) पीव्हीसी पाटील, व्यवस्थापकीय संचालक रिचा चव्हाण-पाटील, सल्लागार संचालक प्रा. डॉ. डी. आर. करनुरे, उपस्थित होते. टिकमसिंग शेखावत, मायकल परेरा, प्रा. सी.बी. अब्राहम यांनी आभार मानले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन.जे. पवार, डॉ. अतनु घोष, आयआयटी मुंबई मार्गदर्शन केले. (प्रतिनिधी)